**"केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना सन २०२४-२५ अंतर्गत भाग-३ - Development of Iconic Tourist Centers to Global Scale या योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देऊन पहिल्या हप्त्यातील निधी वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक शिकाना २०२४/१२/प्र.क्र.२२४/पर्यटन-१**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक : २७ डिसेंबर, २०२४.

**संदर्भ :-**

१. भारत सरकार, वित्त मंत्रालय यांचे पत्र क्र. F.No.४४(१)/PF-S/२०२४-२५(CAPEX) दि.२६.०२.२०२४
२. भारत सरकार, वित्त मंत्रालय यांचे पत्र क्र. F.No.४४(१)/PF-S/२०२४-२५(CAPEX) दि.०९.०८.२०२४.
३. पर्यटन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे कार्यालयीन ज्ञापन दि. २७.०८.२०२४.
४. सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.०९/अर्थबळ, दि.२६/०९/२०२४.
५. उप सचिव, वित्त विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१८(योजनेचा भाग-३)/ अर्थबळ, दि.११/१२/२०२४.
६. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र. टिडीएस २०२४/१२/प्र.क्र.२२१/ पर्यटन-१, दि.१२/१२/२०२४.

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाच्या "राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना सन २०२४-२५ अंतर्गत भाग-३ अंतर्गत ५० वर्षासाठी बिनव्याजी कर्जाच्या स्वरूपात विशेष आर्थिक सहाय करण्यात येत आहे. या संदर्भात उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात आलेली आहेत. त्यानुसार संदर्भ क्र. ३ येथील ज्ञापनातील सूचनानुसार पर्यटन विभागामार्फत केंद्र शासनास सादर करण्यात आलेल्या २ प्रकल्पांना केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागाने दि.२६.११.२०२४ च्या पत्रान्वये मान्यता दिली असून पहिला हप्ता म्हणून रु.९६.३९३० कोटी इतके कर्ज राज्य शासनाच्या एकत्रित निधीत जमा करण्यात आले आहे.

२. केंद्र शासनाच्या संदर्भ क्रमांक २ येथील दि.०९.०८.२०२४ च्या पत्रातील मार्गदर्शक सूचनांनुसार पर्यटन विभागास मंजूर प्रकल्पांसाठी प्राप्त होणारे कर्ज खर्च करण्यासाठी संदर्भ क्रमांक ६ येथील शासन निर्णयान्वये विभागाने SNA नियुक्ती करुन Scheduled Commercial बँकेत SNA खाते उघडून सदर खाते PFMS प्रणालीवर संलग्न करण्याची कार्यवाही विभागाने पुर्ण केली आहे.

३. त्यानुसार पर्यटन विभागास EX-INS Guldar Underwater Museum, Artificial Reef and Submarine Tourism, Sindhudurg & Development of RAM-KAL-PATH at Nashik या २

प्रकल्पांसाठी केंद्र शासनाच्या अर्थमंत्रालयाच्या व्यय विभागाने दि.२६.११.२०२४ च्या आदेशान्वये मान्यता देऊन पहिल्या टप्प्यासाठी वितरीत करण्यात आलेला रु.९६.३९३० कोटी निधी मंजूर प्रकल्पांसाठी वितरीत करण्यासाठी मंजूर प्रकल्पांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

"केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य सन २०२४-२५ या योजनेच्या भाग-३ Development of Iconic Tourist Centers to Global Scale या भागांतर्गत केंद्र शासनाने मंजुर केलेल्या रु.१४६.०५ कोटी रकमेपैकी सन २०२४-२५ या चालु वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय तरतूदीमधून खालील तक्त्यात नमूद प्रकल्पांसाठी पहिल्या हप्त्याचा रु.९६.३९३० कोटी (६६%) इतका निधी तक्ता 'अ' प्रमाणे उद्दिष्टनिहाय स्तंभ क्र.६ येथे नमूद केल्यानुसार वितरीत करण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे. त्याचा उद्दिष्टनिहाय तपशिल तक्ता 'ब' प्रमाणे आहे. :-

**तक्ता 'अ'** **(रु.कोटीत)**

| अ. क्र | प्रकल्पाचे नाव | अंमलबजावणी यंत्रणा | मंजूर रक्कम | उद्दीष्ट | या आदेशान्वये वितरीत करावयाची |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १) | EX-INS Guldar Underwater Museum, Artificial Reef and Submarine Tourism, Sindhudurg | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ | ४६.९१ | २७-लहान बांधकामे, | ६.४२३८ |
| | | | | ५३-मोठी बांधकामे | १८.११२९ |
| | | | | ५०-इतर खर्च | ६.४२३८ |
| २) | Development of "RAM-KAL-PATH" at Nashik | नाशिक महानगरपालिका | ९९.१४ | २७-लहान बांधकामे, | १३.५७६२ |
| | | | | ५३-मोठी बांधकामे | ३८.२८०१ |
| | | | | ५०-इतर खर्च | १३.५७६२ |
| | | **एकूण** | **१४६.०५** | | **९६.३९३०** |

**<u>तक्ता 'ब'</u>**

| उद्दिष्ट | देयकांची रक्कम (रुपये कोटीत) |
|---|---|
| २७-लहान बांधकामे | २०.०० |
| ५३-मोठी बांधकामे | ५६.३९३० |
| ५०-इतर खर्च | २०.०० |
| **एकूण** | **९६.३९३०** |

२. उपरोक्त प्रकल्पासाठी वितरीत केलेला निधी मागणी क्र. **"झेडडी-०५, ५४५२ पर्यटनावरील भांडवली खर्च, ०१ पर्यटनासाठी पायाभूत सुविधा, (०१) केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत बिनव्याजी कर्ज, (०१)(०१) भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२४-२५ (योजना-भाग-३) अंतर्गत आयकॉनिक पर्यटन केंद्राचा विकास (केंद्र हिस्सा १०० %)** २७ - लहान बांधकामे, ५३ - मोठी बांधकामे व ५० इतर खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०२४-२५ मधील मंजुर अर्थसंकल्पीय तरतूदीमधून खर्ची घालण्यात यावा.

३. सदर देयके बिनशर्त स्वरुपाची असून उपरोक्त लेखाशिर्षाखालील निधी आहरीत करण्यासाठी अवर सचिव, रोख शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांना "**आहरण व संवितरण**

**अधिकारी**" तसेच, सह / उप सचिव, पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभाग, मुंबई यांना **"नियंत्रक अधिकारी"** म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. १ मध्ये नमूद करण्यात आलेली रक्कम "आहरण व संवितरण" अधिकारी यांनी अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्याकडे देयके सादर करुन या योजनेशी संबंधित महाराष्ट्र बँक, मंत्रालय शाखा यांच्यामार्फत तयार करण्यात आलेल्या व **परिशिष्ट 'अ' येथे नमूद केलेल्या SNA बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात यावी.** तसेच याबाबतच्या खर्चाच्या ताळमेळाची कार्यवाही पर्यटन -१ कार्यासनाने करावी.

५. शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. १ येथील कामांनकरीता सहायक संचालक, (विकास) पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना **"समन्वय अधिकारी"**, म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी या योजनेशी संबंधित अंमलबजावणी यंत्रणाना वितरीत करण्यात आलेला निधीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करुन कामांच्या प्रगतीबाबतचा मासिक अहवाल शासनास सादर करण्याबाबत अंमलबजावणी यंत्रणांशी समन्वय करावा. तसेच, समन्वय अधिकारी यांनी केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली खर्चासाठी विशेष सहायय योजनेच्या भाग-३ अंतर्गत वितरीत करण्यात आलेल्या निधी संदर्भात महालेखापाल कार्यालय यांनी विहीत केलेल्या नमून्यात लेख्यांचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

६. या आदेशाने वितरीत केलेला निधी केंद्र शासनाने ज्या प्रकल्पांसाठी मंजुर केला आहे, त्याच प्रकल्पासाठी व त्यातील प्रयोजनासाठी खर्च होईल यांची जबाबदारी समन्वय अधिकारी यांची राहील.

७. केंद्र शासनाच्या वित्त विभागाने निर्गमित केलेल्या दि.२६.०२.२०२४ व दि.०९.०८.२०२४ रोजीच्या मार्गदर्शक सूचनाचे तसेच राज्य शासनामार्फत वेळोवेळी देण्यात येणारा सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन प्रकल्प निहाय वितरीत करण्यात आलेला निधी खर्च करण्यात यावा.

८. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, अनौपचारीक संदर्भ क्र.२९/२०२४/शिकाना, दि.१८/१२/२०२४ रोजीच्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४१२२७१४५६३०११२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH VITHAL ROKADE

Digitally signed by SANTOSH VITHAL ROKADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT, 2.5.4.20=ca5751ffedbb005fdff34ab6ac1f8319d061483d7d35e20f744e251360f7920a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ECF4A9ABE84C70DE989C3669424C12B6CADCB583D500FE489CE8727916E0BBEE, cn=SANTOSH VITHAL ROKADE
Date: 2024.12.27 14:57:32 +05'30'

**( संतोष जया विठ्ठल रोकडे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

५. अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

६. सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय मुंबई.

७. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.

८. महालेखापाल, (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), मुंबई.

९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.

१०. संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

११. जिल्हाधिकारी, नाशिक

१२. आयुक्त, महानगरपालिका नाशिक, नाशिक

१३. नियोजन विभाग (कार्यासन-१४११/१४४४), मंत्रालय, मुंबई.

१४.वित्त विभाग (का.व्यय-१५/ अर्थसंकल्प) मंत्रालय, मुंबई.

१५. अवर सचिव (अर्थसंकल्प शाखा), पर्यटन व सांस्कृतिक विभाग, मंत्रालय, मुंबई

१६. निवडनस्ती (पर्यटन-१)

# परिशिष्ट 'अ'

बँक खाते तपशिल खालील प्रमाणे :-

| | |
|---|---|
| **SNA Agency Name** | Tourism and Cultural Affairs Department, Maharashtra |
| **Account Name** | PART III DEVELOPMENT OF ICONIC TOURIST CENTERS TO GLOBAL SCALE |
| **A/C NO.** | ६०५१७६४८८१२ |
| **IFSC Code** | MAHB०००१३८८ |
| **MICR Code** | ४०००१४००० |
| **Branch Code** | १३८८ |